महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा.क्र. : तंशिविकापु/विवि/स्टार्टअप यात्रा/२०२२/ 3803 दिनांक : ०४.०८.२०२२

**परिपत्रकः** 05 AUG 2022

**प्रति,**
**संचालक/प्राचार्य,**
**शासकीय, अशासकीय अनुदानित, खाजगी विनाअनुदानित**
**सर्व तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था**
**पुणे विभाग.**

**विषयः महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्टअप धोरण २०१८ अंतर्गत आयोजित "महाराष्ट्र स्टार्टअप व नाविन्यता यात्रा" च्या प्रभावी अंमलबजावणीबाबत..**

संदर्भः १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र जा.क्र. ३/स्टार्टअप/आयटी सेल/२०२२/१६ दिनांक ०३.०८.२०२२.
२) या विभागीय कार्यालयाचे कार्यालयीन आदेश जा.क्र. तंशिविकापु/विवि/स्टार्टअप यात्रा/२०२२/ दिनांक ०४.०८.२०२२

राज्यातील नाविन्यपूर्ण संकल्पना आणि नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत "महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्ट अप धोरण २०१८" जाहीर करण्यात आले आहे. सदर धोरणाच्या माध्यमातून राज्यामध्ये स्टार्ट-अप्स परिसंस्थेच्या विकासाकरिता पोषक वातावरणनिर्मिती करुन त्यातून यशस्वी नवउद्योजक घडविण्याकरिता इनक्युबेटर्सची स्थापना व विस्तार, गुणवत्ता परीक्षण व स्टार्टअप्सना बौध्दिक मालमत्ता हक्कासाठी अर्थसहाय्य, ग्रॅड चॅलेंज, स्टार्टअप वीक यांसारख्या अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

नविन्यता, कल्पकता यांना भौगोलिकतेच्या मर्यादा नसतात, त्या कुठेही यशस्वी होऊ शकतात. नवकल्पनांना योग्य पाठबळ मिळण्याची आवश्यकता असते परंतु काही वेळा योग्य मार्गदर्शनाअभावी चांगल्या कल्पना प्रत्यक्षात उतरु शकत नाहीत. राज्यातील नागरिकांच्या नवसंकल्पनांना मूर्त स्वरुप देण्यासाठी विभागामार्फत महाराष्ट्र स्टार्टअप व नाविन्यता यात्रेचे आयोजन करण्यात येत आहे.

तंत्रशिक्षण संचालनालय, पुणे विभागामधील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर या पाच जिल्ह्यांमध्ये सोबत जोडलेल्या वेळापत्रकाप्रमाणे यात्रेचे आयोजन करण्यात येणार आहे.

**महाराष्ट्र स्टार्टअप व नाविन्यता यात्रेचे ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.**

- महाराष्ट्राच्या तळागाळातील नवउद्योजकांचा आणि नाविन्यपूर्ण कल्पनांचा शोध घेवून त्यांना स्थानिक पातळीवर व्यासपीठ उपलब्ध करुन देणे.
- नवसंकल्पनांना तसेच सुरुवातीच्या टप्प्यातील नवउद्योजकांना प्रोत्साहन, तज्ञ मार्गदर्शन, निधी आणि आवश्यक पाठबळ पुरविणे.
- राज्यातील उद्योजकता व नाविन्यपूर्ण परिसंस्था बळकट करणे.

**स्टार्टअप यात्रेचे प्रामुख्याने ३ टप्पे असतील.**

**१. तालुकास्तरीय प्रचार प्रसिध्दी व जनजागृती अभियान.**

प्रत्येक तालुक्यातील लोकसमुह एकत्रित होण्याच्या जागेवर स्टार्टअप यात्रेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी एक वाहन (mobile van) यात्रेबाबतची संपूर्ण माहिती, नावीन्यपूर्ण संकल्पना व त्याचे इतर पैलू तसेच विभागामार्फत राबवल्या जाणा-या विविध उपक्रमांबद्दल माहिती देण्यात येईल.

२. **जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबीर व सादरीकरण सत्र.**
सर्व तालुक्यांत प्रचार प्रसिध्दी झाल्यानंतर, राज्यातील सर्व जिल्ह्यात एकदिवसीय प्रशिक्षण शिबिर व सादरीकरण सत्रांचे आयोजन केले जाईल, प्रशिक्षण शिबीरात नाविन्यता तथा उद्योजकतेबाबतचे माहिती सत्र, स्थानिक उद्योजकांची व्याख्याने, तज्ञ मार्गदर्शक व सल्लागारांची सत्रे, तसेच नोंदणी केलेल्या नवउद्योजकांचे संकल्पना सादरीकरण सत्र आयोजित करण्यात येणार आहे.

३. **राज्यस्तरीय अंतिम सादरीकरण सत्र व विजेत्यांची घोषणा समारोह.**
प्रत्येक जिल्ह्यातील सादरीकरण सत्रातील उत्तम १० कल्पनांचे अंतिम सादरीकरण राज्यस्तरीय तज्ञ समितीसमोर करण्यात येईल. राज्यस्तरीय विजेत्यांना रोख अनुदान तसेच इनक्युबेशन सहय्य, बीज भांडवल/निधी साठी सहाय्य, नाविन्यता परिसंस्थेतील महत्वाच्या संस्था व तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शक सत्रे तसेच सॉफ्टवेअर क्रेडिट्स, क्लाऊड क्रेडिट्स सारखे इतर लाभही पुरविण्यात येतील.

**सदर यात्रेमध्ये सहभाग नोंदविण्याकरिता विद्यार्थी व नवउद्योजक खालील माध्यमांद्वारे आपला अर्ज सादर करु शकतात.**

१. तालुकास्तरावर प्रचार प्रसिध्दी अभियानादरम्यान
२. महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीचे संकेतस्थळ (www.msins.in)
३. जिल्हास्तरीय सादरीकरण सत्राच्या ठिकाणी (Spot registration)

स्टार्टअप यात्रेच्या प्रभावी व यशस्वी अंमलबजावणीसाठी पुणे विभागातील सर्व जिल्ह्यांकरीता **"नोडल अधिकारी"** म्हणून **डॉ. सचिन शामरावजी भरतकर,** विभाग प्रमुख विद्युत अभियांत्रिकी, शासकीय तंत्रनिकेतन, पुणे (मोबाईल क्र. ९९७०९११५७७ / ई-मेल : bharatkar.sachin@gppune.ac.in) यांची नेमणूक करण्यात येत आहे.

सर्व संस्थांना कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या महाराष्ट्र स्टार्टअप व नाविन्यता यात्रा करिता मार्गदर्शक तत्वे याचे अवलोकन करुन सदर स्टार्टअप यात्रा व इतर उपक्रम यशस्वी होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी व यासंदर्भात नोडल अधिकारी डॉ. भरतकर यांचेशी संपर्क साधावा.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रतः
१. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई (कार्यासन क्रमांक ०३)
२. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, पुणे.
३. डॉ. सचिन शामरावजी भरतकर, नोडल अधिकारी - स्टार्टअप यात्रा **तथा** विभागप्रमुख-विद्युत अभियांत्रिकी, शा.तं.नि., पुणे (प्राचार्य, शा.तं.नि., पुणे यांचेमार्फत)

| Maharashtra Startup and Innovation Yatra Schedule | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Division** | **Name of District** | **Taluka Name** | **Date** | **Day** | **No of Bootcamps** | **Date of Bootcamp-1** | **Day** | **Date of Bootcamp-2** | **Day** |
| **Pune Division** | **Sangli** | Jath | 26 August 2022 | Friday | 2 | 12 September 2022 | Monday | 13 September 2022 | Tuesday |
| **Pune Division** | **Sangli** | Shirala | 02 September 2022 | Friday | 2 | 12 September 2022 | Monday | 13 September 2022 | Tuesday |
| **Pune Division** | **Sangli** | Walwa (Islampur) | 02 September 2022 | Friday | 2 | 12 September 2022 | Monday | 13 September 2022 | Tuesday |
| **Pune Division** | **Sangli** | Khanapur-Vita | 22 August 2022 | Monday | 2 | 12 September 2022 | Monday | 13 September 2022 | Tuesday |
| **Pune Division** | **Sangli** | Atpadi | 22 August 2022 | Monday | 2 | 12 September 2022 | Monday | 13 September 2022 | Tuesday |
| **Pune Division** | **Sangli** | Miraj | 25 August 2022 | Thursday | 2 | 12 September 2022 | Monday | 13 September 2022 | Tuesday |
| **Pune Division** | **Sangli** | Kavathe-Mahankal | 25 August 2022 | Thursday | 2 | 12 September 2022 | Monday | 13 September 2022 | Tuesday |
| **Pune Division** | **Sangli** | Tasgaon | 24 August 2022 | Wednesday | 2 | 12 September 2022 | Monday | 13 September 2022 | Tuesday |
| **Pune Division** | **Sangli** | Palus | 24 August 2022 | Wednesday | 2 | 12 September 2022 | Monday | 13 September 2022 | Tuesday |
| **Pune Division** | **Sangli** | Kadegaon | 03 September 2022 | Saturday | 2 | 12 September 2022 | Monday | 13 September 2022 | Tuesday |
| | | | | | | | | | |
| **Pune Division** | **Satara** | Phaltan | 20-08-2022 | Saturday | 2 | 07 September 2022 | Wednesday | 08 September 2022 | Thursday |
| **Pune Division** | **Satara** | Koregaon | 20-08-2022 | Saturday | 2 | 07 September 2022 | Wednesday | 08 September 2022 | Thursday |
| **Pune Division** | **Satara** | Khatav (Vaduj) | 20-08-2022 | Saturday | 2 | 07 September 2022 | Wednesday | 08 September 2022 | Thursday |
| **Pune Division** | **Satara** | Maan (Dahiwadi) | 22 August 2022 | Monday | 2 | 07 September 2022 | Wednesday | 08 September 2022 | Thursday |
| **Pune Division** | **Satara** | Satara | 22 August 2022 | Monday | 2 | 07 September 2022 | Wednesday | 08 September 2022 | Thursday |
| **Pune Division** | **Satara** | Jaoli | 22 August 2022 | Monday | 2 | 07 September 2022 | Wednesday | 08 September 2022 | Thursday |
| **Pune Division** | **Satara** | Wai | 20 August 2022 | Saturday | 2 | 07 September 2022 | Wednesday | 08 September 2022 | Thursday |
| **Pune Division** | **Satara** | Mahabaleshwar | 20 August 2022 | Saturday | 2 | 07 September 2022 | Wednesday | 08 September 2022 | Thursday |
| **Pune Division** | **Satara** | Khandala | 20 August 2022 | Saturday | 2 | 07 September 2022 | Wednesday | 08 September 2022 | Thursday |
| **Pune Division** | **Satara** | Patan | 23 August 2022 | Tuesday | 2 | 07 September 2022 | Wednesday | 08 September 2022 | Thursday |
| **Pune Division** | **Satara** | Karad | 23 August 2022 | Tuesday | 2 | 07 September 2022 | Wednesday | 08 September 2022 | Thursday |
| | | | | | | | | | |
| **Pune Division** | **Solapur** | Sangole | 27 August 2022 | Saturday | 2 | 14 September 2022 | Wednesday | 15 September 2022 | Thursday |
| **Pune Division** | **Solapur** | Pandharpur | 27 August 2022 | Saturday | 2 | 14 September 2022 | Wednesday | 15 September 2022 | Thursday |
| **Pune Division** | **Solapur** | Mangalvedhe | 29-08-2022 | Monday | 2 | 14 September 2022 | Wednesday | 15 September 2022 | Thursday |
| **Pune Division** | **Solapur** | Solapur North | 29-08-2022 | Monday | 2 | 14 September 2022 | Wednesday | 15 September 2022 | Thursday |
| **Pune Division** | **Solapur** | Solapur South | 29-08-2022 | Monday | 2 | 14 September 2022 | Wednesday | 15 September 2022 | Thursday |
| **Pune Division** | **Solapur** | Akkalkot | 30 August 2022 | Tuesday | 2 | 14 September 2022 | Wednesday | 15 September 2022 | Thursday |
| **Pune Division** | **Solapur** | Malshiras | 23 August 2022 | Tuesday | 2 | 14 September 2022 | Wednesday | 15 September 2022 | Thursday |
| **Pune Division** | **Solapur** | Karmala | 24 August 2022 | Wednesday | 2 | 14 September 2022 | Wednesday | 15 September 2022 | Thursday |
| **Pune Division** | **Solapur** | Madha | 25 August 2022 | Thursday | 2 | 14 September 2022 | Wednesday | 15 September 2022 | Thursday |
| **Pune Division** | **Solapur** | Mohol | 25 August 2022 | Thursday | 2 | 14 September 2022 | Wednesday | 15 September 2022 | Thursday |
| **Pune Division** | **Solapur** | Barshi | 26 August 2022 | Friday | 2 | 14 September 2022 | Wednesday | 15 September 2022 | Thursday |
| | | | | | | | | | |
| **Pune Division** | **Kolhapur** | Chandgad | 01 September 2022 | Thursday | 1 | 16 September 2022 | Friday | | |
| **Pune Division** | **Kolhapur** | Ajra | 02 September 2022 | Friday | 1 | 16 September 2022 | Friday | | |
| **Pune Division** | **Kolhapur** | Gadhinglaj | 02 September 2022 | Friday | 1 | 16 September 2022 | Friday | | |
| **Pune Division** | **Kolhapur** | Kagal | 03 September 2022 | Saturday | 1 | 16 September 2022 | Friday | | |
| **Pune Division** | **Kolhapur** | Karvir | 03 September 2022 | Saturday | 1 | 16 September 2022 | Friday | | |
| **Pune Division** | **Kolhapur** | Bhudargad | 30 August 2022 | Tuesday | 1 | 16 September 2022 | Friday | | |
| **Pune Division** | **Kolhapur** | Radhanagari | 30 August 2022 | Tuesday | 1 | 16 September 2022 | Friday | | |
| **Pune Division** | **Kolhapur** | Gaganbawada | 01 September 2022 | Thursday | 1 | 16 September 2022 | Friday | | |
| **Pune Division** | **Kolhapur** | Panhala | 01 September 2022 | Thursday | 1 | 16 September 2022 | Friday | | |
| **Pune Division** | **Kolhapur** | Shahuwadi | 02 September 2022 | Friday | 1 | 16 September 2022 | Friday | | |

| Maharashtra Startup and Innovation Yatra Schedule | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Division** | **Name of District** | **Taluka Name** | **Date** | **Day** | **No of Bootcamps** | **Date of Bootcamp-1** | **Day** | **Date of Bootcamp-2** | **Day** |
| **Pune Division** | **Kolhapur** | Hatkanangale | 26 August 2022 | Friday | 1 | 16 September 2022 | Friday | | |
| **Pune Division** | **Kolhapur** | Shirol | 26 August 2022 | Friday | 1 | 16 September 2022 | Friday | | |
| | | | | | | | | | |
| **Pune Division** | **Pune** | Shirur | 17 August 2022 | Wednesday | 2 | 15 September 2022 | Thursday | 16 September 2022 | Friday |
| **Pune Division** | **Pune** | Daund | 18 August 2022 | Thursday | 2 | 15 September 2022 | Thursday | 16 September 2022 | Friday |
| **Pune Division** | **Pune** | Purandhar (Saswad) | 19 August 2022 | Friday | 2 | 15 September 2022 | Thursday | 16 September 2022 | Friday |
| **Pune Division** | **Pune** | Baramati | 19 August 2022 | Friday | 2 | 15 September 2022 | Thursday | 16 September 2022 | Friday |
| **Pune Division** | **Pune** | Indapur | 23 August 2022 | Tuesday | 2 | 15 September 2022 | Thursday | 16 September 2022 | Friday |
| **Pune Division** | **Pune** | Junnar | 29 August 2022 | Monday | 2 | 15 September 2022 | Thursday | 16 September 2022 | Friday |
| **Pune Division** | **Pune** | Ambegaon (Ghodegaon) | 30 August 2022 | Tuesday | 2 | 15 September 2022 | Thursday | 16 September 2022 | Friday |
| **Pune Division** | **Pune** | Khed (Rajgurunagar) | 30 August 2022 | Tuesday | 2 | 15 September 2022 | Thursday | 16 September 2022 | Friday |
| **Pune Division** | **Pune** | Pune City | 17-08-2022 | Wednesday | 2 | 15 September 2022 | Thursday | 16 September 2022 | Friday |
| **Pune Division** | **Pune** | Haveli | 17-08-2022 | Wednesday | 2 | 15 September 2022 | Thursday | 16 September 2022 | Friday |
| **Pune Division** | **Pune** | Maval (Vadgaon) | 18 August 2022 | Thursday | 2 | 15 September 2022 | Thursday | 16 September 2022 | Friday |
| **Pune Division** | **Pune** | Mulshi (Paud) | 18 August 2022 | Thursday | 2 | 15 September 2022 | Thursday | 16 September 2022 | Friday |
| **Pune Division** | **Pune** | Velhe | 19 August 2022 | Friday | 2 | 15 September 2022 | Thursday | 16 September 2022 | Friday |
| **Pune Division** | **Pune** | Bhor | 19 August 2022 | Friday | 2 | 15 September 2022 | Thursday | 16 September 2022 | Friday |
| | | | | | | | | | |
| **Amravati Division** | **Akola** | Balapur | 17 August 2022 | Wednesday | 1 | 13 September 2022 | Tuesday | | |
| **Amravati Division** | **Akola** | Telhara | 20 August 2022 | Saturday | 1 | 13 September 2022 | Tuesday | | |
| **Amravati Division** | **Akola** | Akot | 20 August 2022 | Saturday | 1 | 13 September 2022 | Tuesday | | |
| **Amravati Division** | **Akola** | Akola | 17 August 2022 | Wednesday | 1 | 13 September 2022 | Tuesday | | |
| **Amravati Division** | **Akola** | Patur | 17 August 2022 | Wednesday | 1 | 13 September 2022 | Tuesday | | |
| **Amravati Division** | **Akola** | Barshitakli | 18 August 2022 | Thursday | 1 | 13 September 2022 | Tuesday | | |
| **Amravati Division** | **Akola** | Murtajapur | 18 August 2022 | Thursday | 1 | 13 September 2022 | Tuesday | | |
| | | | | | | | | | |
| **Amravati Division** | **Amravati** | Dharni (Amravati) | 22 August 2022 | Monday | 2 | 05 September 2022 | Monday | 06 September 2022 | Tuesday |
| **Amravati Division** | **Amravati** | Chikhaldara | 22 August 2022 | Monday | 2 | 05 September 2022 | Monday | 06 September 2022 | Tuesday |
| **Amravati Division** | **Amravati** | Achalpur | 23 August 2022 | Tuesday | 2 | 05 September 2022 | Monday | 06 September 2022 | Tuesday |
| **Amravati Division** | **Amravati** | Anjangaon-Surji | 23 August 2022 | Tuesday | 2 | 05 September 2022 | Monday | 06 September 2022 | Tuesday |
| **Amravati Division** | **Amravati** | Chandurbazar | 24 August 2022 | Wednesday | 2 | 05 September 2022 | Monday | 06 September 2022 | Tuesday |
| **Amravati Division** | **Amravati** | Morshi | 24 August 2022 | Wednesday | 2 | 05 September 2022 | Monday | 06 September 2022 | Tuesday |
| **Amravati Division** | **Amravati** | Warud | 25 August 2022 | Thursday | 2 | 05 September 2022 | Monday | 06 September 2022 | Tuesday |
| **Amravati Division** | **Amravati** | Teosa | 27 August 2022 | Saturday | 2 | 05 September 2022 | Monday | 06 September 2022 | Tuesday |
| **Amravati Division** | **Amravati** | Dhamangaon | 29 August 2022 | Monday | 2 | 05 September 2022 | Monday | 06 September 2022 | Tuesday |
| **Amravati Division** | **Amravati** | Daryapur | 19 August 2022 | Friday | 2 | 05 September 2022 | Monday | 06 September 2022 | Tuesday |
| **Amravati Division** | **Amravati** | Bhatukali | 19 August 2022 | Friday | 2 | 05 September 2022 | Monday | 06 September 2022 | Tuesday |
| **Amravati Division** | **Amravati** | Amravati | 20 August 2022 | Saturday | 2 | 05 September 2022 | Monday | 06 September 2022 | Tuesday |
| **Amravati Division** | **Amravati** | Chandur | 20 August 2022 | Saturday | 2 | 05 September 2022 | Monday | 06 September 2022 | Tuesday |
| **Amravati Division** | **Amravati** | Nandgaon Khandeshwar | 22 August 2022 | Monday | 2 | 05 September 2022 | Monday | 06 September 2022 | Tuesday |
| | | | | | | | | | |
| **Amravati Division** | **Buldhana** | Chikhli | 29 August 2022 | Monday | 2 | 14 September 2022 | Wednesday | 15 September 2022 | Thursday |
| **Amravati Division** | **Buldhana** | Deulgaon Raja | 30 August 2022 | Tuesday | 2 | 14 September 2022 | Wednesday | 15 September 2022 | Thursday |
| **Amravati Division** | **Buldhana** | Sindkhed Raja | 30 August 2022 | Tuesday | 2 | 14 September 2022 | Wednesday | 15 September 2022 | Thursday |
| **Amravati Division** | **Buldhana** | Lonar | 01 September 2022 | Thursday | 2 | 14 September 2022 | Wednesday | 15 September 2022 | Thursday |

## महाराष्ट्र स्टार्टअप व नाविन्यता यात्रा - मार्गदर्शक तत्वे

**पार्श्वभूमी**

राज्यातील नाविन्यपूर्ण संकल्पना आणि नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत "महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्ट अप धोरण २०१८" जाहीर करण्यात आले आहे. सदर धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी ही नोडल एजन्सी म्हणून कार्यरत आहे. सदर धोरणाच्या माध्यमातून राज्यामध्ये स्टार्ट-अप्स परिसंस्थेच्या विकासाकरिता पोषक वातावरणनिर्मिती करुन त्यातून यशस्वी नवउद्योजक घडविण्याकरिता इनक्युबेटर्सची स्थापना व विस्तार, गुणवत्ता परीक्षण व स्टार्टअप्सना बौद्धिक मालमत्ता हक्कासाठी अर्थसहाय्य, ग्रँड चॅलेंज, स्टार्टअप वीक यांसारख्या अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

नविन्यता, कल्पकता यांना भौगोलिकतेच्या मर्यादा नसतात, त्या कुठेही यशस्वी होऊ शकतात. नवकल्पनांना योग्य पाठबळ मिळण्याची आवश्यकता असते परंतु काही वेळा योग्य मार्गदर्शनाअभावी चांगल्या कल्पना प्रत्यक्षात उतरू शकत नाहीत. राज्यातील नागरिकांच्या नवसंकल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी विभागामार्फत **महाराष्ट्र स्टार्टअप व नाविन्यता यात्रेचे** आयोजन करण्यात येत आहे.

महाराष्ट्र स्टार्टअप व नाविन्यता यात्रेचे (स्टार्टअप यात्रा) ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत,

- महाराष्ट्राच्या तळागाळातील नवउद्योजकांचा आणि नाविन्यपूर्ण कल्पनांचा शोध घेवून त्यांना स्थानिक पातळीवर व्यासपीठ उपलब्ध करुन देणे
- नवसंकल्पनांना तसेच सुरुवातीच्या टप्प्यातील नवउद्योजकांना प्रोत्साहन, तज्ज्ञ मार्गदर्श|न, निधी आणि आवश्यक पाठबळ पुरवणे
- राज्यातील उद्योजकता व नाविन्यपूर्ण परिसंस्था बळकट करणे
- महाराष्ट्रातील नाविन्यपूर्ण, कल्पना असणारे सर्व नागरिक या यात्रेत सहभागी होण्यास पात्र असतील.

स्टार्टअप यात्रेचे प्रामुख्याने ३ टप्पे असतील:

१. तालुकास्तरीय प्रचार प्रसिद्धी व जनजागृती अभियान
२. जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिर व सादरीकरण सत्र (Boot Camp and Pitching Session)
३. राज्यस्तरीय अंतिम सादरीकरण सत्र व विजेत्यांची घोषणा (Final Pitching Session and Grand Finale)

### १. प्रचार प्रसिद्धी व जनजागृती अभियान:

स्टार्टअप यात्रेच्या या प्रथम टप्प्यात प्रत्येक तालुक्यातील शाळा / महाविद्यालये / ITI / लोकसमुह एकत्रित होण्याच्या जागेवर स्टार्टअप यात्रेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी एक वाहन (mobile van) पाठविण्यात येईल. सदर वाहनासोबत असलेल्या प्रतिनिधिद्वारे नागरिकांना या यात्रेबाबतची संपूर्ण माहिती, नावीन्यपूर्ण संकल्पना व त्याचे इतर पैलू तसेच विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांबद्दल माहिती देण्यात येईल. याचबरोबर नावीन्यपूर्ण कल्पना असलेल्या नागरिकांची नोंदणी करून यात्रेच्या पुढील टप्प्याबाबत माहितीही पुरविण्यात येईल.

### २. जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिर आणि सादरीकरण सत्र (Boot Camp and Pitching Session):

सर्व तालुक्यांत प्रचार प्रसिद्धी झाल्यानंतर, राज्यातील सर्व जिल्ह्यांत एकदिवसीय प्रशिक्षण शिबिर व सादरीकरण सत्रांचे आयोजन केले जाईल. प्रशिक्षण शिबिरात नाविन्यता तथा उद्योजकतेबाबतचे माहिती सत्र, स्थानिक उद्योजकांची व्याख्याने, तज्ज्ञ मार्गदर्शक व सल्लागारांची सत्रे, तसेच नोंदणी केलेल्या नवउद्योजकांचे संकल्पना सादरीकरण सत्र आयोजित करण्यात येणार आहे.

## जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिर आणि सादरीकरण सत्र : प्रस्तावित वेळापत्रक

| प्रथम सत्र – प्रशिक्षण शिबिर (सकाळी ०९.०० ते दुपारी १२.००) | |
|---|---|
| विभागाच्या विविध उपक्रमांची माहिती | **२० मिनिटे**<br>**९.०० ते ९.२०** |
| स्थानिक Start-up / उद्योजकांची व्याख्याने | **२० मिनिटे**<br>**९.२० ते ९.४०** |
| कार्यशाळेचे विषय (Workshop)<br>• उद्योजकता व नविन्यतेची ओळख करून देणे (Introduction to Entrepreneurship and innovation)<br>• Start-up Journey (स्टार्टअपचा प्रवास)<br>  o कल्पना निर्मिती आणि त्यांचे प्रमाणीकरण (Idea Generation & Validation)<br>  o Design Thinking<br>  o विक्री आणि विपणन योजना (Sales and Marketing Plans)<br>  o वित्तपुरवठा, निधीपुरवठा, कायदेशीर सल्ला आणि बौद्धिक संपदा हक्क (Finance, Funding, Legal & IP)<br>  o Funding<br>  o सादरीकरण (प्रेझेंटेशन) कसे तयार करावे व नमुना सादरीकरण सत्र (How to prepare pitch deck and Mock pitch session)<br>  o स्टार्टअपनी करावयाच्या आणि न करावयाच्या गोष्टी | **१०० मिनिटे**<br>**१०:२० ते १२:००** |
| **द्वितीय सत्र – सादरीकरण (दुपारी १.०० ते सायं. ६.००)** | |
| प्रत्येक सादरीकरणास कमाल १० मिनिटांचा वेळ दिला जाईल ज्यामधे ५ मिनिट सादरीकरणास असतील व ५ मिनिट प्रश्नोत्तरांसाठी असतील<br>जास्त संकल्पना असल्यास सायंकाळी ६:०० नंतरही सादरीकरण घेण्यात येईल. | **दुपारी १ ते ६** |

सादरीकरण सत्रात नोंदणी केलेल्या नागरिकांना स्थानिक समस्येसाठी उत्तम उपाय व विविध क्षेत्रांतील आपल्या नावीन्यपूर्ण कल्पना व उद्योगांचे सादरीकरण जिल्हास्तरीय तज्ञ समितीसमोर करण्याची संधी देण्यात येईल. प्रत्येक सादरीकरण सत्रातील उत्तम १० कल्पना राज्यस्तरीय सादरीकरण सत्रात सहभागी होण्यास पात्र असतील.

### जिल्हास्तरीय निवड :

- जिल्हास्तरावरील विजेत्यांची निवड कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समितीद्वारे केली जाईल. निवडीचे निकष परिशिष्टात नमूद केले आहेत.

### ३. राज्यस्तरीय सादरीकरण सत्र व विजेत्यांची घोषणा समारोह (Final Pitching Session and Grand Finale)

अ. प्रत्येक जिल्ह्यातील सादरीकरण सत्रातील उत्तम १० कल्पनांचे अंतिम सादरीकरण राज्यस्तरीय तज्ञ समितीसमोर करण्यात येईल.

आ. अंतिम विजेत्यांची निवड राज्यस्तरीय निवड समितीद्वारे केले जाईल.

राज्यस्तरीय निवड समितीची स्थापना मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी हे करतील.

**प्रस्तावित निवड समिती:**

- अध्यक्ष - मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी
- सह सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग
- विद्यालये / महाविद्यालय यांचे प्रतिनिधी
- बँक प्रतिनिधी
- राज्यातील नामांकित उद्योजक / स्टार्टअप
- इनक्यूबेटर्स चे प्रतिनिधी
- स्टार्टअप परिसंस्थेतील भागीदार

राज्यस्तरीय विजेत्यांना रोख अनुदान तसेच इनक्युबेशन सहाय्य, बीज भांडवल / निधी साठी सहाय्य, नाविन्यता परिसंस्थेतील महत्वाच्या संस्था व तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शक सत्रे तसेच सॉफ्टवेअर क्रेडिट्स, क्लाऊड क्रेडिट्स सारखे इतर लाभ ही पुरविण्यात येतील.

**महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीचे कार्य व जबाबदाऱ्या**

यात्रे पूर्वी:

- प्रचार प्रसिद्धी व जनजागृती अभियान चे नियोजन करणे
- सर्व जिल्हे व विभागांसाठी यजमान संस्थांची नावे निर्धारित करणे
- यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी आवश्यक संस्था व व्यक्तींसोबत भागीदारी करणे
- सर्व संबंधित शासकीय विभाग, अधिकारी यांना यात्रे बाबत सूचित करणे.
- स्टार्टअप यात्रेविषयी नागरिकांना करावयाच्या मार्गदर्शनाबाबत सत्र आयोजित करणे
- प्रशिक्षण शिबिर आणि सादरीकरण सत्राची रूपरेषा तयार करणे
- Outreach Partners ची नियुक्ती करणे

यात्रे दरम्यान:

- यात्रेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व भागीदारांशी समन्वय साधने
- सामाजिक प्रभाव असू शकणाऱ्या स्टार्टअप्सना महाराष्ट्र स्टार्टअप वीक मधे सहभाग घेण्यासाठी प्रवृत्त करणे

यात्रे नंतर:

- विजेत्या स्टार्टअप व नवउद्योजकांना इनक्यूबेटर्स सोबत जोडून त्यांना आवश्यक ती मदत पुरवणे.
- विजेत्यांना रोख अनुदान तसेच इनक्युबेशन समर्थन, अँजेल/सीड गुंतवणुकीसाठी समर्थन, नाविन्यता परिसंस्थेतील महत्वाच्या संस्था व तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शक सत्रे तसेच सॉफ्टवेअर क्रेडिट्स, क्लाऊड क्रेडिट्स सारखे इतर लाभ पुरवणे.
- नवउद्योजक व स्टार्टअप्सना इनक्यूबेटर्स व मार्गदर्शक यांच्याशी जोडून आवश्यक ती मदत पुरवणे.

**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समिती –**

- जिल्हा स्तरावर स्टार्टअप यात्रेच्या प्रभावी नियोजन व अंमलबजावणी साठी एक नोडल अधिकारी नेमणे.
- जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत स्टार्टअप यात्रेबाबत वरील माहिती पोहोचवणे व योग्य ती पूर्व तयारी करण्यास प्रवृत करणे.
- प्रशिक्षण शिबिरासाठी जिल्ह्यातील स्थानिक व्यावसायिक, स्टार्टअप्स, उद्योगपती यांचे नावे सुचविणे.
- जिल्हास्तरीय सादरीकरण सत्रासाठी प्रस्तावित असलेल्या महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांच्या ठिकाणी आवश्यक बाबींची पडताळणी व उपलब्धता सुनिश्चित करणे (मध्यवर्ती हॉल, सादरीकरणासाठी स्वतंत्र कक्ष, प्रोजेक्टर व इतर पायाभूत सुविधा)
- सादरीकरण सत्र प्रस्तावित असलेल्या ठिकाणी पाणी, नाश्ता व स्वच्छतेच्या पुरेश्या सोयींची व्यवस्था करणे.
- स्टार्ट-अप यात्रेमधे जिल्ह्याच्या ठिकाणी होणाऱ्या सादरीकरण सत्रासाठी तज्ञ म्हणून नाविन्यता व उद्योजकता या विषयांचे ज्ञान असणाऱ्या व्यक्तींचे नावे सुचवणे.
- जिल्ह्यातील प्रचार प्रसिद्धी व जनजागृती अभियानाचे ठिकाणे तसेच मार्गदर्शन व प्रशिक्षण शिबिराविषयी वृतापत्रे व सोशल मीडिया द्वारे माहीती प्रसारित करणे.
- जिल्हास्तरीय प्रचार प्रसिद्धी व जनजागृती अभियान उद्घाटन समारंभासाठी पालकमंत्री/आमदारांशी समन्वय साधणे
- यात्रेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आवश्यक ती मदत पुरविणे.

**भागीदार संस्था (Partners):**

महाराष्ट्र स्टार्टअप आणि नाविन्यता यात्रा आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी व जिल्हा नाविन्यता परिषद विविध संस्थांसोबत भागीदारी करेल.

**यजमान संस्थेचे (Host Institute) कार्य व जबाबदाऱ्या –**

- महाराष्ट्र स्टार्टअप व नाविन्यता यात्रेसाठी स्पर्धक नोंदणी कार्यक्रम राबवणे
- तज्ञ, मार्गदर्शक, उद्योजक आणि वक्ते यांच्याशी समन्वय साधून प्रशिक्षण शिबिर आणि सादरीकरण सत्रासाठी नियुक्ती करणे
- प्राप्त अर्जांचे मूल्यमापन करण्यासाठी तज्ञ-मूल्यमापन समिती बनवणे
- तज्ञ-मूल्यमापन समितीस मूल्यमापनाचे निकष याबाबत अवगत करणे
- मार्गदर्शन व प्रशिक्षण शिबिर तसेच सादरीकरण सत्राचे आयोजन करणे
- जिल्हास्तरीय सादरीकरण सत्रासाठी प्रस्तावित असलेल्या महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांच्या ठिकाणी आवश्यक बाबींची पडताळणी व उपलब्धता सुनिश्चित करणे (मध्यवर्ती हॉल, सादरीकरणासाठी स्वतंत्र कक्ष, प्रोजेक्टर व इतर पायाभूत सुविधा)
- सादरीकरण सत्र प्रस्तावित असलेल्या ठिकाणी पाणी, नाश्ता व स्वच्छतेच्या पुरेश्या सोयींची व्यवस्था करणे.

**जिल्ह्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाविद्यालये व शैक्षणिक संस्था यांचे कार्य व जबाबदाऱ्या**

- आपल्या संस्थेतील शिक्षकांचे प्रशिक्षण सत्र आयोजित करणे, ज्यामध्ये स्टार्टअप यात्रेविषयी विद्यार्थ्यांना करावयाच्या मार्गदर्शनाविषयी त्यांना अवगत करणे
- विद्यार्थ्यांना सादरीकरण सत्रासाठी मार्गदर्शन करणे व सराव सत्रे आयोजित करणे
- सदर जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत स्टार्टअप यात्रेबाबत वरील माहिती पोहोचवणे व योग्य ती पूर्व तयारी करण्यास प्रवृत करणे.
- प्रशिक्षण शिबिरासाठी जिल्ह्यातील स्थानिक व्यावसायिक, स्टार्टअप्स, उद्योगपती यांचे नावे सुचविणे.
- तसेच सदर यात्रेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आवश्यक ती मदत पुरविणे.

Outreach Partners **कार्य व जबाबदाऱ्या (नियुक्ती महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीद्वारे करण्यात येईल)**

- उद्घाटन समारंभ आयोजित करणे
- सर्व ३६ जिल्ह्यांमधे प्रचार व प्रसिद्धीसाठी mobile van ची व्यवस्था करणे
- प्रचार प्रसिद्धी व जनजागृती अभियान आणि सादरीकरण सत्राच्या ठिकाणी (बूटकॅम्पसाठी) आवश्यक ब्रँडिंग आणि विपणन करणे (एलईडी स्क्रीन, प्रत्येक व्हॅन स्टॉप आणि बूटकॅम्पवर जाहिरातीसाठी समर्पित संसाधने)
- यात्रेसाठी ध्वनीफित व चित्रफीत (ऑडिओ व्हिज्युअल) तसेच जिंगल्स, क्रिएटिव्ह तयार करणे
- ऑनलाइन नोंदणी फॉर्म तयार व वेब पोर्टल तयार करणे
- यात्रेसाठी राज्य तसेच जिल्हा स्तरीय dashboard तयार करणे.
- गाडी थांबा आणि बूटकॅम्पसाठी ठिकाण निहाय बॅनर तयार करणे
- प्रोजेक्टर, स्क्रीन, स्टेशनरीची व्यवस्था करणे
- प्रत्येक जिल्हा मुख्यालयात उद्घाटन समारंभाचे नियोजन करणे
- अंतिम फेरीचे आयोजन करणे
- प्रसिद्धी, दळणवळण (लॉजिस्टिक) आणि एकूण कार्यक्रमाच्या आयोजन करणे
- प्रतिभागींच्या नोंदणीसाठी आवश्यक माहिती आणि पायाभूत सुविधा प्रदान करणे
- कार्यक्रमाच्या विविध टप्प्यांवर आवश्यक त्या बाबींची व्यवस्था करणे
- प्रचार प्रसिद्धी दरम्यान GIS mapping करून छायाचित्रांसोबत दैनिक अहवाल सादर करणे.
- निवेदेनुसार इतर कार्य व जबाबदाऱ्या (Other works as mentioned in tender document)

**इनक्यूबेशन केंद्रांचे कार्य व जबाबदाऱ्या (Role of Incubation Support Partners):**

- इनक्यूबेशन केंद्र ही महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी मान्यता प्राप्त अथवा राज्यातील इतर इनक्यूबेशन केंद्र असू शकतात
- विजेत्या स्टार्टअप्सना प्री-इन्क्युबेशन/इन्क्युबेशन पाठबळ पुरविणे
- मूल्यांकन समितीसाठी तज्ञ सुचविणे
- यात्रेबाबतची माहिती जास्तीत जास्त स्टार्टअप्स, नवउद्योजक व नागरिकांपर्यंत पोहोचवणे
- कार्यक्रमाच्या विविध टप्प्यांवर स्टार्टअप्सना / नवउद्योजकांना मार्गदर्शन प्रदान करणे

Knowledge Partner **कार्य व जबाबदाऱ्या:**

१. तज्ञ मार्गदर्शनाद्वारे यात्रेच्या प्रभावी नियोजन व आयोजनासाठी मदत करणे
२. मार्गदर्शक व तज्ञ व्यक्तींना या उपक्रमासोबत जोडण्यास मदत करणे
३. प्रशिक्षण सत्र व प्रचार प्रसिद्धीसाठी मदत करणे
४. प्रचार प्रसिद्धी व जनजागृती अभियानात नागरिकांना मार्गदर्शन करण्यासाठी योग्य प्रतिनिधि नियुक्त करण्यास मदत करणे.
५. मूल्यांकन समिती साठी तज्ञ सुचविणे

**जिल्हा कौशल्य विकास अधिकारी कार्य व जबाबदाऱ्या::**

- महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी आणि इतर भागधारकांसोबत प्रभावी समन्वयासाठी एक स्वतंत्र अधिकारी नियुक्त करणे
- जिल्ह्यात यात्रेच्या प्रचार प्रसारासाठी स्थानिक वृतपत्रे व इतर माध्यमातून माहिती पोहोचवणे
- प्रचार प्रसिद्धी व जनजागृती अभियान आणि सादरीकरण सत्राच्या (बूट कॅम्पच्या) आधी विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा आणि प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यासाठी संबंधित जिल्ह्यातील विद्यापीठे, प्राचार्य, संस्था, इन्क्युबेशन केंद्र यांच्याशी समन्वय साधणे
- संबंधित जिल्ह्यातील यात्रेच्या अधिकृत उद्घाटन समारंभासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाशी समन्वय साधने तसेच जास्तीत जास्त सहभागासाठी इतर सरकारी विभागांशी समन्वय साधणे
- प्रशिक्षण शिबिर व सादरीकरण सत्रासाठी स्थानिक मार्गदर्शक, उद्योजक यांच्याशी समन्वय साधने
- इन्क्युबेशन केंद्रे व Knowledge Partner **व यजमान संस्था** यांच्या सोबत समन्वय

**ब्रॅंड अम्बॅसॅडर कार्य व जबाबदाऱ्या:**

सदर उपक्रमासाठी नाविन्यता सोसायटी एक ब्रॅंड अम्बॅसॅडर नियुक्त करेल.

- महाराष्ट्र स्टार्टअप व नाविन्यता यात्रेच्या प्रचार प्रसिद्धीसाठी मदत करणे
- स्टार्टअप यात्रेमधे सहभागी होणे व प्रतिभागींसोबत संवाद साधने, त्यांना प्रेरित करणे
- जिल्हा स्तरावरही स्वतंत्र ब्रॅंड अम्बॅसॅडर नियुक्त करता येईल

# सादरीकरण सत्रे

| विभाग | जिल्हा | सादरीकरण सत्र |
|---|---|---|
| अमरावती विभाग | अकोला | १ |
| | अमरावती | २ |
| | बुलढाणा | २ |
| | यवतमाळ | २ |
| | वाशिम | १ |
| औरंगाबाद विभाग | औरंगाबाद | २ |
| | बीड | २ |
| | जालना | १ |
| | उस्मानाबाद | १ |
| | लातूर | १ |
| | नांदेड | २ |
| | परभणी | १ |
| | हिंगोली | १ |
| कोकण विभाग | मुंबई शहर | १ |
| | मुंबई उपनगर | १ |
| | ठाणे | १ |
| | पालघर | १ |
| | रायगड | १ |
| | रत्नागिरी | २ |
| | सिंधुदुर्ग | १ |
| नागपूर विभाग | भंडारा | १ |
| | चंद्रपूर | २ |
| | गडचिरोली | २ |
| | गोंदिया | १ |
| | नागपूर | २ |
| | वर्धा | १ |
| नाशिक विभाग | अहमदनगर | २ |
| | धुळे | २ |
| | जळगाव | २ |
| | नंदुरबार | १ |
| | नाशिक | २ |
| पुणे विभाग | कोल्हापूर | १ |
| | पुणे | २ |
| | सांगली | २ |
| | सातारा | २ |
| | सोलापूर | २ |
| | | ५४ |

**पारितोषिके:**

प्रत्येक जिल्ह्यामधून अव्वल ३ विजेते घोषित केले जातील, तसेच सर्वोत्तम १० (अव्वल ३ पकडून) सहभागींना राज्य स्तरावर सादरीकरणाची संधी भेटेल.

**जिल्हा स्तरावर पारितोषिके:**

प्रथम : २५,०००/-
द्वितीय : १५,०००/-
तृतीय : १०,०००/-

**राज्य स्तरीय पारितोषिके (₹)**

| वर्णन | क्षेत्र | एकूण अनुदान | रक्कम |
|---|---|---|---|
| विभागाचा स्टार्ट अप हिरो | सर्व क्षेत्रे | ६ | १,००,००० |
| विभागीय सर्वोत्कृष्ट महिला उद्योजिका | सर्व क्षेत्रे | ६ | १,००,००० |
| सर्वोत्तम नाविन्यपूर्ण कल्पना | कृषि | पहिले पारितोषिक | १,००,००० |
| | | दुसरे पारितोषिक | ७५,००० |
| सर्वोत्तम नाविन्यपूर्ण कल्पना | शिक्षण | पहिले पारितोषिक | १,००,००० |
| | | दुसरे पारितोषिक | ७५,००० |
| सर्वोत्तम नाविन्यपूर्ण कल्पना | आरोग्य | पहिले पारितोषिक | १,००,००० |
| | | दुसरे पारितोषिक | ७५,००० |
| सर्वोत्तम नाविन्यपूर्ण कल्पना | सस्टेनीबिलिटी (कचरा व्यवस्थापन, पाणी, स्वच्छ उर्जा इ.) | पहिले पारितोषिक | १,००,००० |
| | | दुसरे पारितोषिक | ७५,००० |
| सर्वोत्तम नाविन्यपूर्ण कल्पना | ई-प्रशासन | पहिले पारितोषिक | १,००,००० |
| | | दुसरे पारितोषिक | ७५,००० |
| सर्वोत्तम नाविन्यपूर्ण कल्पना | स्मार्ट पायाभूत सुविधा आणि गतिशीलता | पहिले पारितोषिक | १,००,००० |
| | | दुसरे पारितोषिक | ७५,००० |
| सर्वोत्तम नाविन्यपूर्ण कल्पना | इतर | पहिले पारितोषिक | १,००,००० |
| | | दुसरे पारितोषिक | ७५,००० |
| जिल्हास्तरीय विजेते | प्रथम | ३६ | २५,००० |
| | द्वितीय | ३६ | १५,००० |
| | तृतीय | ३६ | १०,००० |

जर एकच प्रतिभागी २ वेग-वेगळ्या गटांमध्ये विजेता राहिला तर सर्वात जास्त रकमेचे पारितोषिक त्या प्रतिभागीला घोषित करून, रिक्त गटामधे पुढील विजेत्यांचा विचार केला जाईल.

**प्रपत्र - I**
**स्टार्टअप यात्रा अर्ज**

| |
|---|
| अर्जदाराचे नाव - |
| ई-मेल - |
| संपर्क क्रमांक - |
| तालुका - |
| जिल्हा - |
| संकल्पना / प्रस्तावित प्रकल्पाचे शीर्षक - |
| संकल्पना / प्रस्तावित प्रकल्पाविषयी संक्षिप्त माहिती |
| Sectors:<br>• **कृषि** - कृषि, ग्रामीण विकास आणि संबंधित क्षेत्र, अन्न प्रक्रिया या विभागांमध्ये नाविन्यता आणण्यासाठीचे उपाय.<br>• **शिक्षण** - शिक्षणाचा दर्जा सुधारणे व कौशल्य विकासात मदत करणारे उपकरणे व उपाय<br>• **आरोग्य** - आरोग्य सेवा व बायोमेडिकल उपकरणे<br>• **शास्वत विकास (सस्टेनेबिलिटी)** - घन कचरा व्यवस्थापन, पेयजल, अपारंपारीक व किफायती ऊर्जा<br>• **स्मार्ट पायाभूत सुविधा आणि गतिशीलता** - Smart Vehicles/ Electric vehicle and battery technology, Robotics and Drones, IoT based technologies (e.g. Security & Surveillance systems etc.), ICT, cyber physical systems, Block chain, Cognitive computing, Cloud computing, AI & ML, Fintech solutions<br>• **ई-प्रशासन** - स्मार्ट प्रशासन, आपत्ति व्यवस्थापन , पर्यटन, धोरण अंमलबजावणी या बाबींमध्ये प्रशासन व जनसामान्यांना मदत करणारे उपाय अथवा उपकरणे<br>• **इतर** कुठलाही उपाय अथवा समाधान जे नावीन्यपूर्ण आहे |
| ज्या समस्येवर तुम्ही उपाययोजना सुचवत आहात त्या समस्येविषयी थोडक्यात माहिती. त्या समस्येवर सध्या अस्तित्वात असलेले समाधान. (३०० शब्द) |
| तुमच्या प्रस्तावित उपाययोजनेमधील नाविन्यता व वेगळेपानाविषयी माहिती. (३०० शब्द) |
| तुम्ही सुचवलेल्या उपाययोजणेद्वारे होणाऱ्या बादलाविषयी माहिती (२०० शब्द) |
| **महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी कडून अपेक्षित मदत :**<br>• मार्गदर्शन<br>• इनक्युबेशन सहाय्य<br>• गुणवत्ता परीक्षण व प्रमानण<br>• टीम बनवण्यासाठी सहाय्य<br>• निधी उभारणी<br>• Market Connect संबंधीत बाजारपेठेतील ओळख<br>• इतर |
| कुठल्याही प्रकारचा निधी प्राप्त केला असेल तर त्याविषयीची माहिती: |

## प्रपत्र-२

## मार्गदर्शक तक्ता व गुण अहवाल

| | | | |
|---|---|---|---|
| अर्ज क्रमांक: | | | |
| अर्जदाराचे नाव / टीम प्रमुखाचे नाव: | | | |
| ई-मेल: | | | |
| संपर्क क्रमांक: | | | |
| संकल्पना / प्रस्तावित प्रकल्पाचे शीर्षक: | | | |
| संकल्पना / प्रस्तावित प्रकल्पाविषयी संक्षिप्त माहिती - | | | |
| **अ.क्र.** | **गुणांकणासाठी विचारात घेण्याचे मुद्दे** | **एकूण गुण** | **प्राप्त गुण** |
| | समस्या व सुचवलेल्या उपायाचा परस्पर संबंध | | |
| १. | अ . मांडलेली समस्या खरोखर अस्तित्वात आहे का ? | १० गुण | |
| | ब. समस्या ची व्याप्ती ? (लहान, मध्यम, मोठी) | ५ गुण | |
| | उपायाची व्यवहार्यता (SMART) (प्रस्तावित उपायाची योग्यता) | २५ गुण | |
| | (a) Specific - संबंधित समस्येला प्रस्तावित उपाय किती योग्य रित्या सोडवते | ५ गुण | |
| | (b) Measurable- प्रस्तावित उपाययोजनेचे मूल्यमापन करता येईल का? तसेच उपाययोजना तयार करण्यात व्यवस्थित प्रक्रिया वापरली गेली आहे का ? | ५ गुण | |
| | (c) Attainable- प्रस्तावित उपाय तयार करणे व राबवण्यासाठी अर्जदारचे कौशल्य आणि क्षमता आहे का? | ५ गुण | |
| २. | (d) Realistic- अस्तित्वात असलेल्या साधनसामुग्री सोबत अर्जदार दिलेल्या वेळेत उपाययोजना राबवू शकतो का? | ५ गुण | |
| | (e) Timeline- अर्जदार दिलेल्या वेळेत उपाययोजना राबावण्याविषयी अर्जदाराचा आत्मविश्वास? | ५ गुण | |
| | प्रस्तावित उपाययोजनेची उपयुक्तता | १० गुण | |
| | (a) **उपयुक्तता**: प्रस्तावित उपायांची स्वीकार्यअर्हता | | |
| | (b) **स्केलेबिलिटी**: व्यवसाय मॉडेल / स्टार्टअप म्हणून उपायांचा अवलंब होण्याची क्षमता | | |
| ३. | (c) **आर्थिक स्थिरता**: फायदेशीर किंवा आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य होण्यासाठी उपायाची संभाव्यता | | |
| | (d) **पर्यावरण स्थिरता**: पर्यावरणस्नेही बनण्याची उपायाची संभाव्यता | | |
| | (e) काही **बौद्धिक संपदा** घटकाचे अस्तित्व आहे का? | | |
| एकूण | | ५० गुण | |

**प्रस्तावित कल्पनेची श्रेणी**

LEVEL ०: कल्पना - अतिशय प्रारंभीक टप्प्यातील संकल्पना, कोणतीही चाचणी केली गेली नाही.

LEVEL १: संकल्पनेचा पुरावा - मूलभूत संशोधन, तंत्रज्ञान प्रमाणीकरण केलेले आहे

LEVEL २: किमान व्यवहार्य उत्पादन - चाचणी आणि प्रमाणपत्र पूर्ण आहे आणि प्रथम कार्यकरण्यायोग्य (आणि विक्रीयोग्य) आवृत्ती तयार

LEVEL ३: प्रोटोटाइप - प्रयोगशाळेच्या वातावरणात तयार केलेले आणि वापरकर्त्यांद्वारे चाचणी किंवा अनुभवलेले

LEVEL ४: पूर्ण व्यावसायिक - ग्राहकांसाठी उपलब्ध